Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील वारकरी संतांचे कार्य

**डॉ. दिपाली चंद्रकांत पांडे**
सहाय्यक प्राध्यापक, संगीत विभाग,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणी सावरगाव.

**प्रस्तावना:**

मराठवाड्याला संतांची महान परंपरा लाभलेली आहे. संतांच्या भक्तीने आणि पावन विचाराने आपली मराठवाडा भूमी पवित्र झाली आहे. संतांच्या ठायी मानवी जीवनाचे ध्येय ही मोक्ष नसून भक्ति आहे. संत परंपरेत भक्तीयोगाला अनन्य साधारण महत्व आहे. कारण संतांनी भक्तिला 'साध्य' मानले आहे. कारण भक्ति ही साधनावस्थेत व सिद्धअवस्थेत दोन्ही ठिकाणी आनंदरूप आहे. संतांनी समाजातील सर्व स्तरातील लोकांना एकत्र आणले आहे. सामाजिक जनजागृती करण्याचे कार्य हे कोणी केले असेल तर केवळ संतांनीच केले आहे. संत हे समाजाचा आरसा आहेत. संत ही आपली माऊलीच आहे आणि म्हणूनच वारकरी भक्ति परंपरेत संत मंडळींचा उच्चार हा 'माऊली' असा केला जातो. गुरु जवळ जाऊन ज्ञान प्राप्त करावे लागते मात्र संत ते ज्ञान आपल्याला आपल्या जवळ येऊन देतात. आपण कसं वागलं पाहिजे याचे अनमोल संस्कार संतांकडून होतात. संत एकनाथ महाराज आपल्या अभंगाद्वारे मांडतात की, धन्य आज दिन संत दर्शनाचा / अनंत जन्मीचा क्षीण गेला ||

संत भेटीमुळे आपल्याला अतिशय चांगली चालना मिळते आपल्याला जन्मो-जन्मी आलेला शिण दूर होतो आणि संतांचे केवळ दर्शन झालेला दिन सुद्धा धन्य होतो. संतांची महत्ती वर्णावी तेवढी कमी आहे आणि अशा या संतांची महान परंपरा मराठवाडा परीक्षेत्राला प्राप्त झालेली आहे. वारकरी संप्रदायाचा पाया ज्यांनी भक्कम केला ते संत ज्ञानेश्वर हे मराठवाड्याच्या पावनभूमितच जन्माला आले आणि म्हणूनच मराठवाड्याच्या भूमीला संत महंताची भूमी म्हणून संबोधले आहे.

**ध्येय / उद्देश**
1) संत परंपरेचे महत्व विशद करणे.
2) संत परंपरेचा संक्षिप्त इतिहास अभ्यासणे.
3) संत साहित्याची आवश्यकता स्पष्ट करणे.
4) मराठवाड्यातील संतांच्या कार्यावर प्रकाश टाकणे.

**महत्व :**

सद्य परिस्थितीत विचार करता असे लक्षात येते की, ही परिस्थिति खूपच भयावह आहे. स्वातंत्र्यानंतर ही परिस्थिति सुधारेल असं वाटलं होतं पण इतिहास पाहता असे लक्षात येते की प्रत्येक कालखंडात कोणता न कोणता संघर्ष मानवास करावाच लागतो. प्राचीन काळा नंतर या पृथ्वीवर अनेक उलथा-पालथी झालेल्या पाहावयास मिळतात. मध्ययुगीन कालखंडात भारत पुरता विचार केला तर असे दिसते की, संपूर्ण भारत हा परकीय आक्रमणामुळे हादरून गेला होता. ही परकीयांची सत्ता जवळपास १९४७ पर्यन्त सुरूच होती समस्त मानव जातीला अनेक संकटांशी सामना करत जगावे लागत होते. आज परिस्थिति बदललेली आहे, पण सामना मात्र करावाच लागत आहे. आजचे आक्रमण हे दिसत

नाही त्यामुळे आपल्याला वार करायला कठीण जात आहे. वास्तविक पाहता आजचं जग ही सुधारणांचे जग म्हणून ओळखले जाते परंतु या सुधारणेच्या जगातही आपल्याला या महामारीचा सामना करावा लागत आहे, सन 2020 हे संपूर्ण वर्षच तडजोडीच पाहायला मिळालं. महामारीच्या या महान संकटाने संपूर्ण विश्वालाच हादरून सोडले आहे. वैज्ञानिक शोधांसाठी प्रसिद्ध असलेले चीन, अमेरिकेसारखे देश पूर्णपने हतबल झाले होते. भारतावर देखील ही संकट आलेल होतं परंतु भारताने मात्र या संकटाला धिराने तोंड दिले वाईट परिस्थिति मधून चांगले शोधायला लागले या सर्व नकारात्मक परिस्थितीला सकारात्मक बनून पहिले. याचे मुख्य कारण आपली धार्मिक, आध्यात्मिक संत-महंतांची शिकवण आहे, आणि त्यामुळेच या संत साहित्याचा अभ्यास त्यांचे जीवन अभ्यासने महत्वाचे आहे.

मध्ययुगीन काळात संपूर्ण भारतातच अनेक प्रांता- प्रांतात संत उदयाला आले त्यांनी त्या कालखंडात करून ठेवलेले कार्य आजही आपल्या उपयोगाचे आहे. कारण संतांना दूरदृष्टी असते ते पुढील अनंत कालखंडातील परिस्थितीचा विचार करू शकतात कारण तेव्हढा त्यांचा अभ्यास असतो. संशोधकाने तिथे केवळ मराठवाड्याच्या भूमीत जे संत उदयाला आले, कार्य केले, त्याच संतांचा, त्यांच्या कार्याचा आढावा त्यांची ग्रंथ संपदा अभ्यासली आहे, त्याच बरोबर वारकरी संप्रदायाची पताका ज्या संतांनी सांभाळली त्या संत महात्मायांचा इथे उल्लेख केला आहे कारण संपूर्ण संतचा उल्लेख करण्यासाठी हा लेख खूप अपुरा आहे. सागर खूप विशाल आहे परंतु त्यातील एक थेंब या लेखाच्या माध्यमातून समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. या शोधपत्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत गोरोबा, संत जनाबाई, संत मुकताबाई या संतांचा अभ्यास केला आहे. या संतांनी समस्त जनतेस विचार, आचार, एकात्मता, धार्मिक तत्वज्ञान देण्यासाठी अनेक ग्रंथ, अभंग निर्माण केलेले आहेत.

**संत ज्ञानेश्वर:** 'गीता' हा ग्रंथ समस्त मानव जातीच्या कल्याणाचे साधन आहे. हा ग्रंथ कोणत्याही एका काळापूरता नसून तो सर्व काळा करीत महत्वाचा आहे. गीतेचे ही ज्ञान सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून संतश्रेष्ट संत ज्ञानेश्वर महाराजांनी केले आहे. गीता ही केवळ वाचनासाठी नसून ती जगण्यासाठी आहे असा संदेश ज्ञानेश्वर महाजांनी दिला आहे. वारकरी संप्रदायाच्या भजन, कीर्तन, व्याख्यान, बोध, साहित्य या सर्वांची सुरुवात होते ती

अलंकापुरी पुण्यभूमि पवित्र तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र /
तया आठविता महापुण्यराशी नमस्कार माझ्या सद्‌गुरू ज्ञानेस्वराशी //

या महान संतचा जन्म गुरुवार मध्यरात्री श्रावण वद्य अष्टमी श्रीकृष्ण अष्टमी युवा नाम संवत्सरे शेक 1193[1] साली झाला. ज्ञानदेवांचे मूळ गाव आपेगाव पैठण जवळ आहे. विठ्ठल पंत यांना भक्ति व वैराग्याचे वेड होते. त्यांनी अनेक तीर्थ यात्रा केल्या याच तीर्थ यात्रे दरम्यान ते आळंदीस आले व तिथेच त्यांचा विवाह सिद्धपंत कुलकर्णी यांच्या मुलीशी झाला. विवाह झाला तरीही त्यांच्या मनातील वैराग्याचे विचार काही केल्या थांबत नव्हते त्यावेळी त्यांनी काशीला जाऊन प्रसिद्ध महंत यांच्याकडून संन्यास ग्रहण केला परंतु त्या महंतांना विठ्ठल पंत हे विवाहित आहेत हे समजल्यावर त्यांनी विठ्ठल पंत यांना परत जाण्यास सांगितले, त्यावर विठ्ठल पंत आज्ञा मानून परत आळंदीस आले. आल्यानंतर त्यांना चार अपत्ये झाली ती म्हणजे हीच महान संत होत.

संत निवृतीनाथ: सोमवार, प्रात:काल, माघ वाद्य १, श्रीमुख नाम संवत्सरे शके ११९०

संत ज्ञानेश्वर :गुरुवार, मध्यरात्र श्रावण वद्य अष्टमी युवा नाम संवत्सरे शके ११९३

संत सोपानदेव: रविवार, प्रहररात्र, कार्तिक शुद्ध १५ ईश्वर नाम संवत्सरे शके ११९६

संत मुकताबाई: शुक्रवार, माध्यान्न आश्विन शुद्ध १ प्रमाथी नाम सवत्सरे शके ११९९ [2]

संत ज्ञानदेव ही मुळातच कुशाग्र बुद्धीचे होते. या चार ही भावंडांना वडिलांच्या संन्यास घेतल्यामुळे व परत आल्यामुळे अत्यंत हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. विठ्ठल पंत यांना समाजातील सनातनी लोक स्वीकारण्यास तयार नव्हता. समाजातून अतिशय त्रास होऊ लागला परिणामी त्यांना देहत्याग करावा लागला. विठ्ठल पंत व रुखमिनी यांनी दोघांनी ही काशिक्षेत्री जाऊन देहत्याग केला. सर्व मुले अनाथ झाली, एकमेकांना सांभाळत त्यांनी आपली जीवन शैली खडतर असली तरीही खूप प्रेरणादायी केली. वारकरी संप्रदायाची पताका अजरामर करून ठेवली आहे. संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या २१ व्या वर्षात संपूर्ण ज्ञान जगाला समर्पित केले आणि संजीवन समाधी घेतली. या काळात त्यांनी आपल्या प्रवचन कीर्तन मधून समाजातील अंधश्रद्धा, दूर करण्याचे काम केले.

**ग्रंथ संपदा:**

१) भावार्थदीपिका: ज्ञानदेवांनी भावार्थ दीपिका म्हणजेच ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या माध्यमातून 'गीता' मराठी भाषेतून केली. कारण गीते मध्ये भक्ति ज्ञान कर्म मार्गाचा समन्वय आहे. समस्त मानव जातीला हे समजण्यासाठी ज्ञानदेवांनी श्रीमद्भगवद गीतेचे मराठी भाषेत निरूपण केले.

२) अमृतानुभव: ज्ञानेश्वरी ची रचना पूर्ण झाल्यावर ज्ञानदेवांनी अमृतानुभव या ग्रंथाची निर्मिती केली. या ग्रंथात वेदांचे सार आहे त्यामुळे हा ग्रंथ ज्ञानेश्वरी पेक्षा तात्विकदृष्ट्या कठोर आहे. ज्ञानेश्वरीतील मायावादाच्या पुढे जावून चिद्विलासवादाची प्रस्थापना या ग्रंथात केलेली आहे.

३) चांगदेव पासष्टी: या ग्रंथात ज्ञानदेवांनी 'तत्वमसी' या महावाक्याचा बोध केला आहे. हा बोध त्यांनी ६५ ओव्यामद्धे केला आहे.

४) अभंगवाणी: यात संतांचा भावनाविष्कार, विचार, अभंग, विरहणी, या भक्तीचे साक्षात्कार समोर मांडले आहेत.

ज्ञानदेवांनी पुढील अनेक शतकानूशतकांची ज्ञान पुंजी आपल्याला दिली आहे ती आपण नक्कीच अभ्यासली पाहिजे.

**संत नामदेव:** संत नामदेवांनी भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार भारतभर केला आहे. संत नामदेवांच्या जन्मा बाबतही अनेक कथा प्रसिद्ध आहेत परंतु या कथांना सिद्धांतिक कोणताही पुरावा मात्र नाही. संत नामदेवांच्या अभंगावरून एक जन्मा विषयी व कुळाविषयी स्पष्टता येते

शिंपीयांचे कुळी जन्म माझ्या झाला / परि हेतु गुंतला सदाशिवी //
रात्री माजी शिव दिवासा माजी शिव / अरानुक जीवी नोव्हें सदा //
सुई आणि सातुळी कात्री गंज दोरा / मांडीला पसारा सदाशिवी //
नामा म्हणे शिवीं विठोबाचे अंगी / म्हनोनिया जगी धन्य जालो //

नामदेवांनी आपले चरित्र अतिशय रसात्मकपणे ओवीबद्ध केले आहे. ते मांडतात की, शिंपी घराण्यात माझ्या जन्म झाला. माझ्या व्यवसाय शिवण कलेचा आहे सुई, अंगुस्तान, ककात्री. दोरा अशा वस्तु माझ्या धंद्याची सामग्री आहे, परंतु असे असले तरीही माझ्या मनाला विठ्ठल नामाची आस लागलेली आहे.[3]

माझे जन्म पत्र बाबाजी ब्राम्हणे / लिहिले त्याची खून सास एका //
अधिक ब्यान्नव गणित अकराशते / उगवता आदित्य रोहिनीसी //
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार / प्रभव संवत्सर शालिवाहन शके //
प्रसवली माता मज मळसूत्री / तेंव्हा जिह्नेवरी लिहिले देवे //
शतकोटी आदित्य करील प्रतिज्ञा / नाम मंत्र खुणा वाचुनी पाहे //
ऐंशी वर्ष आयुष्य पत्रिका प्रमाण / नाम संकीर्तन नामया वृद्धी //

याचाच अर्थ नामदेवांचा जन्म कार्तिक शुद्ध ११ शके ११९२ म्हणजे २६ ऑक्टोबर १२७० रोजी पंढरपूर क्षेत्री झाला आहे. [4] नामदेवांच्या घरातच विठ्ठल भक्तीचे अमाप वेड. नामदेवांना लहानपणापासूनच विठ्ठलाच्या भक्तीचे वेड लागले होते. नामदेवांना संत ज्ञानदेवांच्या भेटीचा योग आला, असे म्हटले जाते की, ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेण्यापूर्वी नामदेवांना सांगितले होते की, 'नामदेवा, मी ज्ञानेश्वरीत जो धर्मविचार सांगितला त्याचा प्रचार, प्रसार करण्याचे काम तुला करायचे आहे.'[5] आणि या वचनाने धर्मप्रचार करण्यासाठी ते बाहेर पडले. भारतातील अनेक प्रांतात जावून त्यांनी प्रचार केला. पंजाब मध्ये तर त्यांना गुरु मानत असत, संत नामदेव जवळपास २० वर्ष पंजाबात होते. नामदेवांनी मराठी भाषे व्यतिरिक्त १२५ पदे ही हिन्दी भाषेत लिहिली होती. यापैकी ६१ पदे गुरु नानक यांच्या 'ग्रंथसाहिब' या पवित्र ग्रंथात आहेत. त्यांना 'नामदेवजी की मुखबाणी' या नावाने ओळखले जाते.

नामदेवांनी संत ज्ञानेश्वररांचे चरित्र 'आदि, तीर्थवली व समाधी या तीन प्रकरणात लिहिले आहे. तसेच नामदेवांची गाथा हे देखील समकालीन ज्ञानेश्वर चरित्रकार म्हणून नामदेवांचा गौरव केला जातो. संत नामदेवांनी वयाच्या ८१ व्या वर्षी म्हणजेच इ. स. १३५० मध्ये त्यांनी पंढरपूर येथे समाधी घेतली.

**संत गोरोबा:** संत गोरोबा यांनाच आपण संत गोरा कुंभार म्हणून ओळखतो. संत गोरोबा यांचा जीवन कालखंड हा १२६७ ते १३१७. मुळत: गोरोबा हे उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरढोकी येथील आहेत. संत गोरबा यांचा व्यवसाय कुंभाराचा होता परंतु तोंडात मात्र अखंड नामस्मरण होते. संत गोरोबा बद्दल दोन आख्यायिका प्रसिद्ध आहेत त्या सर्वपरिचित आहेतच. संत गोरोबा यांचे जवळपास ४३ अभंग आज उपलब्ध आहेत त्यापैकी २१ अभंगात त्यांनी संत नामदेवांना उपदेश केला आहे. गोरोबा ही अत्यंत सहनशील, शांत, वृत्तीचे होते. विठ्ठल भक्ती शिवाय त्यांच्याकडे अन्य ध्येय नव्हते. संत गोरोबा यांनी विठ्ठल भक्तीच्या माध्यमातून अठरापगड जातीतील जनतेला एकत्र घेऊन विठ्ठल नामाची ध्वजा पंढरीत पेटवली. त्याच्या या कार्यातून एकात्मतेचा महान संदेश नक्कीच आपल्याला घेता येतो. समाजात भजन कीर्तनाच्या माध्यमातून सदाचाराची, एकात्मतेची शिकवण त्यांनी दिली आहे. ह्या गोष्टी केवळ उपदेशातूनच केल्या नाहीत तर त्यांच्या प्रत्यक्ष कृतीतून ही समता त्यांनी निर्माण केली होती.

**संत मुक्ताबाई:** त्या काळी ओढवलेल्या परिस्थिति मुळे मुक्ताईच्या आई वडिलांना देहत्याग करावा लागला त्यामुळे मुक्ताईचे सर्व बालपण भावंडांच्या सहवासात गेले. निवृत्ती नाथांनीच मुक्ताईला आई वडिलांच्या ठायी सांभाळले होते. मुकताबाई एक स्त्री असूनही अत्यंत कठीण, दयनीय परिस्थितीत त्यांनी समाज उपदेशपर अभंग लिहिले, त्यांचे ताटीचे अभंग आजही प्रसिद्ध आहेत. 'चांगदेवांच्या कूट प्रश्नांची मुकताबाईने दिलेले उत्तरे आजही समाजाला आत्मभान देणारे आहेत.

मुंगी उडाली आकाशी / तिने गिळिले सूर्याशी //
थोर नवलच जाला / वांझें पुत्र प्रसवला //
विंचू पातळाशी जाय/शेष मामा वंदी पाय //
माशी व्यालि घार झाली/ देखोण मुक्ताई हसली //[6]

या अभंगाचा भावार्थ असा आहे की, आत्म साक्षात्काराची अनुभूति झाल्यानंतर छोट्या जीवा कडूनही अशक्य प्राय गोष्टी घडतात. अशा प्रकारचे तात्विक पण खूप कणखर अभंग मुक्ताई चे आहेत. अल्लड, प्रेमळ, फटकळ, तत्वज्ञानी असे विविध गुण त्यांच्यात होते.

**संत जनाबाई:** परभणी जिल्हयातील गंगाखेड हे संत जनाबाईचे जन्मस्थान. गंगाखेड ला गोदावरीच्या तीरावर एका झोपडीत त्याचे वास्तव्य होते. असे म्हणतात की जनाई च्या आई वडिलांना त्या एकट्याच होत्या. त्यांच्या वडिलांचे नाव दमा व आई चे नाव कुरूंड असे होते. जनाबाईला जन्मतच विठ्ठल भक्तीचे वेड होते. त्यांच्या वडिलांनी त्यांना काही कारणास्तव नरसी येथे संतनामदेवांचे वडील दामाशेठ यांच्या कडे नेऊन सोडले होते. नरसीला संत नामदेवांच्या सहवासात जनाईचे विठ्ठल भक्तीचे प्रेम वाढतच गेले. काही दिवसांनी जनाई संत नामदेवांच्या कुटुंबाबरोबर पंढरपूर येथे गेली. तिथे गोपळपुऱ्यात जनाईचे सामान आजही पाहावयास मिळते.

संत जनाईच्या अभंगात स्त्री मनाची भाषा जाणवते. जनाबाईचे अभंग अभ्यासल्यावर वर्तमान काळातील महिलांनाही ते आदर्श ठरतात, त्यातून प्रेरणा मिळते. त्यांच्या अभंगात ज्ञान भक्ति यांचा संयोग आहे. कोणत्याही कालखंडात ही अभंग अजरामर आहेत.

जोड झाली रे शिवासी/ भ्रांत फिटली जिवाची /
आनंदी आनंदाला / आनंद बोधची बोधला//
आनंदची लहरी ऊठी /ब्रह्मानंद गिळीला पोटी /
एकपण जेथे काही / तेथ विज्ञापती उरली नाही//

**संत एकनाथ:** संत एकनाथांचा जन्म ई.स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. पैठण हे गाव वेद शास्त्र पुराणांचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. संत एकनाथांचे आध्यात्मिक गुरु देवगिरीचे संत जनार्धन स्वामी ही होते. जनार्धन स्वामी कडून त्यांना खूप शिकायला मिळाले, अनेक ग्रंथांचा अभ्यास करायला मिळाला. या सर्व गोष्टी चे संत एकनाथांनी मनन चिंतन केले व समाजाच्या विकासाच्या, परिवर्तनाच्या दृष्टीने साहित्य निर्माण केले. समाजातील अंधश्रद्धा घालविण्यासाठी त्यांनी अनेक उपदेशपर, अभंग केले, अनेक गौळणी, अनेक भारुडे तयार केली.

**ग्रंथ संपदा**: समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले त्याचा आजही आपल्याला मोठ्या प्रमाणात उपयोग होतो.

चतु:श्लोकी भागवत: हा एकनाथांनी लिहिलेला पहिला ग्रंथ आहे. हा ग्रंथ लिहिण्याची आज्ञा त्यांना जनार्धन स्वामी कडून झाली होती. या ग्रंथात त्यांच्या कीर्तन आणि ललित कलांच्या प्रसंगी मुखातून बाहेर पडणाऱ्या शेकडो अभंगाचा समावेश आहे. रुखमिनी स्वयंवर: या ग्रंथात श्रीकृष्ण आणि रुखमिनी यांच्या विवाहाची कथा आहे. या ग्रंथात एकनाथांचे काव्य-कौशल्य आणि भाषा वरील प्रभुत्व अनुभवास येते.

एकनाथी भागवत: वारकरी संप्रदायात एकनाथी भागवत हा ग्रंथ प्रमुख मानला जातो. या ग्रंथात भागवत पुरानातिल ११ व्या अध्यायावर मराठीत ओवीबद्ध टीका केली आहे. भावार्थ रामायण: यात ४० हजार ओव्या आहेत. या ग्रंथाचे हिन्दी सह अनेक भाषेत भाषांतर झाले आहे. या बरोबरच त्यांचे एकनाथी अभंग गाथा,संत एकनाथ महारजकृत हरिपाठ -एकूण २५ अभंग, हस्तमालक टीका, शुकास्तक टीका, आत्म बोध, चिरंजीवपद, अनुभवानंद, मुद्रविलास, लघुगीता अशी त्यांची साहित्यकृती आहे. या सर्वचा उपयोग आपल्याला दैनंदिन जीवनात होतच असतो. अशा या थोर संत महातम्याचे देहगमन फाल्गुन वद्यषष्टि, शके १५२१ म्हणजेच २५ फेब्रुवारी १५९९ रोजी झाले .

**सारांश:**

भारतीय मुळ संस्कृतीच आध्यात्मिक, मांगल्याचे लेनं लेवून आलेली आहे, परंपरेचा पगडा मानव समाजावर आहे धार्मिक आध्यात्मिक वास असल्यामुळे या परंपरेत स्थिरता कायम वास करत असते. मध्ययुगीन कालखंडात अनेक संत महात्मे उदयास आले. जगाच्या पाठीवर येणाऱ्या कोणत्याही संकटाला समोरे जाण्यासाठी त्याच्याकडे तात्विक स्वरूपातील पण कायमस्वरूपी उपाय आहे तो आज पर्यन्त आपल्याला उपयोगात अनंत येत आहे. आजच्या या महामारीच्या काळात आपल्या मनाला स्थिरस्ता देण्यासाठी या विचारांचा, चिंतानाचा अभ्यास व अमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे.

**संदर्भ:**

1) वै. साखरे महाराज, सार्थ ज्ञानेश्वरी, पान नं. ८
2) वै. साखरे महाराज, सार्थ ज्ञानेश्वरी, पान नं. ८
3) डॉ. है. वि. इनामदार, नामा म्हणे, पान नं. २२२
4) डॉ. है. वि. इनामदार, नामा म्हणे, पान नं. २२३
5) व्हि. एन. स्वामी, महाराष्ट्रातील संत,पान नं. ७५
6) प्रा. भगवान काळे, मराठवाड्यातील संत-महंत पान नं. ६३-६४
7) नामदेव गाथा,
8) ज्ञानेश्वरी
9) इंटरनेट विकिपीडिया
10) संत साहित्य app,